महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२४-२५/२०२४/ 4498 — दिनांक : 08 NOV 2024

**महत्वाचे परिपत्रक:**

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदविका अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, एचएमसीटी, सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी,
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय :** **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश गुणवत्ता याद्या ऑनलाईन पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया...**

**संदर्भ :** **१) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/(प्र.क्र.६/१९)/तांशि-५ दिनांक ०६.०२.२०१९.**
**२) शासन निर्णय क्र. E-766368-HTED१४०२५/११/२०२४-MHT-(TE-5), दिनांक ०९.०५.२०२४.**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०६.०२.२०१९ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेशी संबधित बाबीची अंमलबजावणी करण्याकरीता संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून **"सक्षम प्राधिकारी"** म्हणून घोषित करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका तसेच इ.१२वी नंतरचे एच.एम.सी.टी., सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी या पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संचालनालयामार्फत पूर्ण झालेली आहे. त्यास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील पदविका प्रवेशाच्या याद्यांची पडताळणी करुन ऑनलाईन पध्दतीने अंतिम मान्यतेसाठी या विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करावयाच्या आहेत. **यासाठी दिनांक १३.११.२०२४ ते ३०.११.२०२४ या कालावधीत आपल्याला नेमून दिलेल्या संस्थेत जाऊन गुणवत्ता यादी तपासून घ्यावी. तसेच सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार या विभागीय कार्यालयाकडे गुणवत्ता यादीची फाईल जमा करावी.**

<u>प्रवेश याद्यांची ऑनलाईन पडताळणी व मान्यतेची प्रक्रिया खालीलप्रमाणे राहील.</u>

१) संस्थांनी त्यांच्या Login मधून Onilne पध्दतीने प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी पडताळणी करण्याकरीता पाठविण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता/खात्री करणे आवश्यक आहे. त्यानंतर ती यादी Onilne पध्दतीने या विभागीय कार्यालयास सादर करावी. **ज्या संस्था प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या या विभागीय कार्यालयास ऑनलाईनरित्या सादर करणार नाहीत, अशा संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता न मिळाल्यास आणि यामुळे विद्यार्थी मंडळाच्या परिक्षेपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

अ) **सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेनुसार आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व्यवस्थितपणे upload झालेली आहेत किंवा नाहीत, याची खात्री करुन घ्यावी.**

ब) **प्रवेशपात्रतेनुसार आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे upload झालेली नसल्यास प्रथमतः संस्थांनी त्यांच्या login मधून सर्व विद्यार्थ्यांच्या पात्रतेची सर्व मूळ कागदपत्रे upload करावीत.**

२) **सदर यादी संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध असून यादी Forward करण्याआगोदर Cut-off दिनांकानंतर संस्थास्तरावर प्रवेश रद्द झाला असल्यास त्याची नोंद "Mark for Cancellation" ही Link वापरुन करणे अत्यंत आवश्यक आहे.**

३) ज्या संस्थांकडून प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी Onilne पध्दतीने या विभागीय कार्यालयास प्राप्त होईल अशाच संस्थांना ऑनलाईन पध्दतीने पडताळणी अधिकारी यांचे वाटप (Allot) करण्यात येईल याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

४) Institute Login मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व त्यासोबत विद्यार्थ्यांची आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे दर्शविली आहेत. संस्थेने विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे या विभागीय कार्यालयाने नियुक्त केलेल्या पडताळणी अधिका-याकडे (Scrutiny Officer) प्रत्यक्ष जाऊन पडताळणीसाठी सादर करावीत. कागदपत्रे तपासणी करण्यापूर्वी, संस्थांनी सोबत जोडलेल्या तपासणी सूचीनुसार कागदपत्रे जोडून त्याची पडताळणी संबंधित पडताळणी अधिका-याकडून करुन घ्यावी. सदर तपासणीसूचीसह (पडताळणी अधिका-याच्या स्वाक्षरीसह) फाईल (द्विप्रतीत) या विभागीय कार्यालयास या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार सादर करावी.

५) पडताळणी अधिकारी त्यांना वितरीत केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश गुणवत्ता याद्या तपासणी झाल्यानंतर त्यांच्या Remark शे-यासह Confirm करुन ऑनलाईनरित्या या विभागीय कार्यालयास सादर करतील.

६) पडताळणी अधिका-यांच्या शे-या (Remark) मध्ये हे विभागीय कार्यालय बदल करु शकतात. तशी Edit ची सुविधा उपलब्ध आहे.

७) संस्थांकडून तपासणी सूची पडताळणी केलेली फाईल (पडताळणी अधिका-याच्या स्वाक्षरीसह) या विभागीय कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर, सर्व कागदपत्रे योग्य असल्याची खात्री झाल्यास पडताळणी अधिका-याने पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या या विभागीय कार्यालयाच्या अभिप्रायांसह Online पध्दतीने संचालनालयास अंतिम मान्यतेकरिता शिफारस करण्यात येईल.

८) संचालनालयाकडून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे संबंधित संस्थांच्या Login मध्ये उपलब्ध होतील व तशा आशयाचे प्रमाणपत्रसुध्दा संस्थेस त्यांच्या Login मध्ये संचालनालयामार्फत उपलब्ध करुन दिले जाईल.

पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या नियमावलीमध्ये उशिरा प्रवेश / प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे, मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही. ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर केलेले किंवा संचालनालयाच्या संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येणार नाहीत.

**प्रवेश याद्या पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न करणा-या संस्थांमधील उमेदवारांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थाप्रमुख व्यक्तीशः जबाबदार राहतील. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या संस्थांना नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमतेत वाढ करणे इत्यादी यासाठी संबंधित शिखर परिषद व शासन यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी निर्गमीत केलेले अंतिम मान्यता पत्र प्राप्त झाले असेल अशा संस्थांची गुणवत्ता यादी पडताळणी केली जाईल याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.**

**संचालनालयाच्या अंतिम मान्यतेनंतरच विद्यार्थ्यांनी संस्थेत घेतलेले प्रवेश अधिकृत समजण्यात येतील तसेच अनधिकृत प्रवेश रद्द करण्यात येतील याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.**

सोबतः तपासणीसूची

(मारुती जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तपासणी सूची

संस्थेचे संपूर्ण नाव व डीटीई कोड : ______________________________

प्राचार्याचे नाव व मोबाईल नंबर : ______________________________

संस्थेचा फोन (लॅन्डलाईन) नंबर : ______________________________

गुणवत्ता यादी तपासण्यासाठी आलेल्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर : ______________________________

| अ क्र | तपशिल | संस्थेचा शेरा (आहे / नाही /लागू नाही) | पडताळणी अधिका-याचा शेरा |
|---|---|---|---|
| १ | तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संकेतस्थळावर (www.dtemaharashtra.gov.in) अपलोड केलेली प्रथम, थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची शाखानिहाय यादीची तपासणीपुर्वी एक दिवस आगोदर काढलेली प्रिंट १ प्रतीत (प्राचार्यांचे नाव/सही शिक्क्यासह), संचालनालयाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदाहरणार्थ MS Word File etc.) पडताळणीसाठी स्विकारली जाणार नाही. | | |
| २ | प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करताना संस्थेस सक्षम प्राधिकरणाची पीसीआय / एआयसीटीई / मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व महाराष्ट्र शासन यांचे परवानगी / प्रवेश क्षमता वाढ व मुदत वाढ (EOA) परवानगी बाबतचे पत्र. | | |
| ३ | **अ)** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थांची प्रथम वर्षाकरीताची तसेच नवीन अभ्यासक्रम वाढ केल्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई व संस्थाप्रमुख यांची संयुक्त नावे आवश्यक रकमेची मुदतठेव पावती/प्रमाणपत्राची प्राचार्यांनी सांक्षांकीत केलेली छायांकीत प्रत. | | |
| | **ब)** शै. व. २०२३-२४ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्था यांना शासन निर्णयानुसार द्वितीय वर्षासाठी आवश्यक मुदत ठेव पावतीची छायांकित प्रत. | | |
| ४ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या संस्थांना AICTE यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट, अभ्यासक्रमांच्या नावात बदल तसेच संस्थेच्या पत्त्यात बदल इ. प्रकरणी परवानगी देण्यात आलेली असल्यास अशा संस्थांनी शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्क जमा केलेल्या पावतीची छायांकीत प्रत जोडावी. | | |
| ५ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमतेत वाढ करणे इत्यादी यासाठी संबंधित शिखर परिषद व शासन यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी निर्गमीत केलेले अंतिम मान्यता पत्र. | | |
| ५ | संस्थास्तरावरील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील (ACAP) प्रवेशाकरीता संस्थेने संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठी कालावधी, प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची गुणवत्ता यादी. | | |
| ६ | संस्थेतील अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबधीत सर्व कागदपत्रांची संस्थेच्या प्राचार्यांनी/संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेल पत्र प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीसोबत जोडणे आवश्यक आहे. **(सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)** | | |
| ७ | शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत आपल्या संस्थेबद्दलच्या तक्रारींची संस्थाप्रमुखांनी दखल घेऊन त्यांचे निराकरण करावे व शुल्क परतावा बाबत कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र संस्थेच्या प्राचार्यांनी प्रवेश यादी पडताळणी वेळी सादर करावे. **(सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)** | | |
| ८ | अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांनी त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र (वैध कालावधीचे) मूळ प्रत व संस्थाप्रमुखांनी साक्षांकीत केलेली प्रत प्रवेश यादी पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ मधील मंजूर प्रवेशित याद्यांची छायाप्रत. | | |
| ९ | एखाद्या विशिष्ट प्रकरणी मा. सर्वोच्च व मा उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार त्यासंबंधी सर्व कागदपत्रे (साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत) जोडावीत. | | |
| १० | विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी/कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद/शासन निर्णय / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित केल्याबाबतची कागदपत्रे. | | |
| ११ | तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व UNICEF यांनी **"YOUTH ENGAGEMENT AND WATER STEWARDSHIP PROGRAM 2023-25"** या उपक्रमाकरिता निवडलेल्या संस्थांनी आपल्या संस्थेत **"GREEN CLUB"** स्थापन केल्याबाबतची व यासाठी समन्वयक नेमणूक केल्याबाबतची कागदपत्रे. | | |
| १२ | प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या यादीमधील अनुक्रमांकानुसार विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे तपासण्यासाठी लावण्यात यावीत - Receipt cum Acknowledgment of Confirmation of Admission, शैक्षणिक गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र (दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत वैध व विहीत मुदतीत प्राप्त झालेले असावे), अधिवास/राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, शैक्षणिक खंड असल्यास गॅप प्रमाणपत्र, महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी Eligibility/Migration Certificate, TFWS उमेदवारांसाठी उत्पन्नाचा दाखला, EWS उमेदवारांसाठी ई.डब्लू.एस. वैध पात्रता प्रमाणपत्र आवश्यक राहील. (मुळ प्रमाणपत्रांखेरीज कोणतेही झेरॉक्स प्रती व अनावश्यक कागदपत्रे मुळ प्रमाणपत्रासोबत जोडण्यात येऊ नयेत.) | | |

# <u>संस्थेचे लेटरहेड</u>

जावक क्रमांक                                                                                   दिनांक

संस्थेचा डीटीई कोडः

## <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ प्रवेशासंबंधीत कागदपत्र पडताळणी प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये व संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियेमध्ये ______________________________(संस्थेचे नाव व डीटीई कोड) या संस्थेमध्ये प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी तसेच प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी/सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अर्हते संबंधीची आवश्यक मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे (शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या पूर्ण वेळ तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांचे माहिती पुस्तिका मध्ये नमुद केल्याप्रमाणे) यांची पडताळणी केलेली असून ती बरोबर आहेत. तसेच सामाजिक आरक्षणांतर्गत VJ / DT (NT-A) / NT(B) / NT(C) / NT(D) / SBC / OBC या मागास प्रवर्गांतर्गत प्रवेशीत विद्यार्थ्यांचे **३१ मार्च २०२५ पर्यंत वैध असलेले** व सक्षम प्राधिकारी यांनी अभ्यासक्रमनिहाय खालीलप्रमाणे नमुद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत वितरीत केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र आहेत.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्ग (EWS) अथवा शिक्षण शुल्क माफ योजना (TFWS) अंतर्गत राखीव जागांवर प्रवेश प्राप्त झाला आहे, अशा विद्यार्थ्यांचे आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ग्राह्य असलेले विहित नमुन्यातील आर्थिक दृष्ट्या मागास प्रमाणपत्र अथवा आर्थिक वर्ष २०२३-२४ चा उत्पन्नाचा दाखला सक्षम प्राधिकारी यांनी अभ्यासक्रमनिहाय खालीलप्रमाणे नमुद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत वितरीत केलेले आहेत.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | सक्षम प्राधिका-यांनी जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमी लेअर, आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्ग प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला निर्गमीत केल्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी व वास्तूशास्त्र पदविका. | २३.०७.२०२४ |
| २ | थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका. | ०३.०८.२०२४ |
| ३ | पोस्ट एच.एस.सी. **एच.एम.सी.टी, सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी** | १२.०८.२०२४ |

संस्थेचे सील

प्राचार्य
नाव व स्वाक्षरी

D:\Yogesh Kelkar\Admission 2024-25\Diploma\Merit List verification\Diploma merit list verification circular 2024-25.docx

# <u>संस्थेचे लेटरहेड</u>

जावक क्रमांक                                                                                                    दिनांक

संस्थेचा डीटीई कोडः

## <u>शुल्क परताव्याबाबत तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये व संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियेमध्ये ________________________________ (संस्थेचे नाव व डीटीई कोड) या संस्थेमध्ये **प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी / सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी** या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क परताव्याबाबत आज दिनांक _________ पर्यंत संस्थेकडे कोणतीही तक्रार नाही.

संस्थेचे सील

प्राचार्य
नाव व स्वाक्षरी

गुणवत्ता यादी प्रमाणपत्र/गुणपत्रिका तपासणी ज्या ठिकाणी करावयाची अशा कार्यालयाची/संस्थांची यादी.

| अ.क्र. | गुणवत्ता यादी (प्रमाणपत्र/गुणपत्रिका) तपासणी करणारी संस्था | संस्थांचे जिल्हे |
|---|---|---|
| १ | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे<br>शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी (खु)<br>कुसरो वाडीया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे | **पुणे** जिल्ह्यातील सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| २ | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | **सातारा** जिल्ह्यातील सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ३ | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | **सांगली** जिल्ह्यातील सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर | **सोलापूर** जिल्ह्यातील सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर<br>इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हील ॲन्ड रुरल इंजिनिअरींग, गारगोटी, जि. कोल्हापूर | **कोल्हापूर** जिल्ह्यातील सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था. |

**टिप:** तपासणी करणा-या संस्था (जिल्हानिहाय) गुणवत्ता यादी तपासणी वेळापत्रक स्वतंत्रपणे या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केले जाईल.

शासकीय तसेच अशासकीय अनुदानित संस्थांची गुणवत्ता यादी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे येथे तपासली जाईल. (शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तांसगाव व वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (तंत्रनिकेतन), सांगली **या संस्था वगळून**)